शोध पत्र- समाजशास्त्र

Dec.-09—Jan.-2010

# म. ज्योतिराव फुले व ताराबाई शिंदे यांच्या विचारातील साम्य

*प्रा. कु.महानंदा राऊतखेडकर

*समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड ( महाराष्ट्र )

युगपुरुष महात्मा ज्योतिराव फुले सर्वांनाच परिचित आहेत. म. फुलेंनी आपल्या विचार व आचाराने सर्वप्रथम या विषमतावादी समाजव्यवस्थेत समानतेचे बीजारोपण केले. क्रांतीचे रणशिंग फुंकले. स्त्रीशूद्रातीशूद्रांना न्याय, स्वातंत्र्य, समता मिळवून दिली. म.फुलेंनी जे युगप्रवर्तक कार्य केले त्या पाठीमागे एक भक्कत वैचारिक बैठक होती. क्रांतिकारी मानवतावादी विचाराचे पाठबळ होते म्हणूनच म. फुलेंचा जेव्हा आपण एक विचारवंत म्हणून विचार करतो तेव्हा त्यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. मग अशाच पद्धतीचे विचार १८८२ मध्ये 'स्त्री-पुरूष तुलना' या ग्रंथात ताराबाई शिंदे यांनी देखील प्रतिपादन केलेले दिसून येतात.

ताराबाई शिंदे यांचा काळ अदमासे १८४० ते १९१० असा मानला जातो. त्यांचे विचार १९७५ सालापर्यंत महाराष्ट्राला जवळजवळ अज्ञातच होते. १९७५ साली प्रसिद्ध संशोधक व समिक्षक डॉ.स.ग.मालशे ह्यांना त्यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकाचा शोध लागला व ते त्यांनी दीर्घ प्रस्तावनेसह प्रकाशित केले. ताराबाईंच्या कालावधीत त्यांचे नाव फारसे गाजलेले दिसत नाही. ताराबाईंच्या काळात स्त्रिया फारशा शिकत नसत. श्री मालशे पण लिहितात, "एका मराठा बाईने धार्मिक व पौराणिक स्वरूपाचे नव्हे तर सामाजिक ज्वलंत प्रश्नासंबंधी... स्त्री .... पुरुष तुलनेसारख्या प्रश्नावर .... १८८२ साली एक दीर्घ निबंध लिहावा ही खरोखरच नवलाईची गोष्ट म्हटली पाहिजे.[१] म.फुले व ताराबाई शिंदे यांचा जो संबंध येतो तो म्हणजे ताराबाईंचे वडील बापूजी हरी शिंदे हे सत्यशोधक समाजाचे सदस्य होते. ताराबाई शिंदे यांच्यावर बऱ्याच प्रमाणात म. फुलेंच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. आणि हा प्रभाव कोणत्या विचारांच्या बाबतीत पडलेला दिसतो याचे अध्ययन थोडक्यात पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे. म.फुले आणि ताराबाई शिंदे यांच्या लेखनाची तुलना केली असता त्या दोघांत फार मोठे विचारसाम्य आढळते याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येईल.

**कार्यक्षेत्र व संशोधन पद्धती :** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी कोणत्याही गावाची, शहराची मर्यादा न ठेवता उपलब्ध झालेल्या दुययम तथ्य सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधन आराखडा :** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**उद्देश :** महात्मा ज्योतिराव फुले आणि ताराबाई शिंदे यांच्यातील विचारातील साम्याचे चिकित्सक अध्ययन करणे.

**व्याप्ती व मर्यादा :** म.फुले यांचे एक सामाजिक विचारवंत म्हणून सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते. त्याचप्रमाणे स्त्रीवादी लेखिका म्हणून ताराबाई शिंदे यांचे व त्यांच्या विचारांचे अनेक दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते.

मात्र प्रसतुत संशोधन निबंधात दोघांच्या विचारातील साम्यस्थळे कोणती? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असून हा शोध अत्यंत मर्यादित अशा स्वरूपाचा आहे.

**महात्मा फुले :-** "बाळा, तूं सारासार विचार करून पाहिल्याबरोबर स्त्रियांपेक्षा पुरुषच अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहसी, क्रुर व नित्य नवीन ज्यास्ती भयंकर, धाडसी, दुष्ट कर्मे आचरणारे आहेत, म्हणून तुझी सुद्धां खात्री होईल"[२] म.फुलेंनी स्त्री आणि पुरुष या दोघांच्या स्वभावाची तुलना करून पुरुषाच्या स्वभावाचे ज्याप्रमाणे वर्णन केले आहे अगदी त्याप्रमाणेच ताराबाई शिंदे यांनी देखील स्त्री-पुरूष तुलना या ग्रंथात केलेले दिसून येते ते पुढीलप्रमाणे.

**ताराबाई शिंदे :** "रोज पुरुषांचे साहस, धाडस व दगाबाजीचे नित्य नवीन भयंकर उदाहरणे दिसून येत असतांनाही तिकडे कोणीच लक्ष न देता स्त्रियांवरच सर्व दोषांची गोणी लादतात"[३] म.फुले व ताराबाई शिंदे यांच्या समकालीन समाजात सतीप्रथा अस्तित्वात असलेली दिसून येते. म.फुले यांनी या अमानुष प्रथेचा अत्यंत कठोर शब्दात धिक्कार केला. त्याचप्रमाणे ताराबाई शिंदे यांनीही या अमानवी, अन्यायी प्रथेचा विरोध केलेला दिसून येतो तो पुढीलप्रमाणे.

**महात्मा फुले :** "एखाद्या स्त्रीचा नवरा ज्या वेळेस मृत होतो, त्या वेळेस ती फार दुःखसागरात बुडून तिला फार संकटे सोसावीं लागतात. मरेतोंपर्यंत सारा काळ वैधव्यांत काढावा लागतो. इतकेंच नव्हे तर पूर्वी कित्येक सतीदेखील जात असत, परंतु पुरुषाला तिच्याविषयीं दुःख होऊन

तो कधी 'सता' गेलेला ऐकिला आहे काय?[४]

**ताराबाई शिंदे :** "स्त्रिया सतीं जाऊन तुम्ही त्यांच्या मागें गवऱ्या वळायला कां राहता? तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्ही त्याच्याबरोबर का सती जाऊ नये बरें?" [५] म.फुलेंनी इंग्रजी राजवटीबद्दल विचार व्यक्त करतांना इंग्रजी राजवटीमूळे आमची प्रगती झाली असून आमच्यातील अनेक वाईट रूढी, प्रथा, परंपरा नष्ट झाल्या त्या केवळ त्यांच्यामूळेच म्हणून ते इंग्रज राजवट टिकावी अशी इच्छा व्यक्त करतात आणि ताराबाई शिंदे देखील अशाच आशयाचे विचार आपल्या लिखाणातून व्यक्त करतांना दिसतात ते पुढीलप्रमाणे -

**महात्मा फुले :** "सर्वशक्तिमान जो परमेश्वर यानें हरण करून त्यास त्याचे अपराधानुरूप शासन दिले आणि कनवाळू होऊन आपले दुःखांनी पिडित अशा शूद्रादि अतिशूद्र प्रजेस परम न्यायी, हितावह, सौख्यकारक, सदाचारी आणि शांत असे राज्य इंग्रज सरकारच्या अंमलाखाली प्राप्त करून दिले. सबब ती त्या प्रभूची फार फार ऋणी आहे व त्यास रात्रंदिवस अशी प्रार्थना करीत आहे की, "हे प्रभो, आम्हांस हे राज्य चिरकाल असूं दे"[६].

**ताराबाई शिंदे :** इंग्रज सरकारचे, ईश्वर असे सदोदित चिरकाल राज्य कायम ठेवो हा राजा (शककर्ता) झाल्यापासून स्त्रियांना विद्यादान देऊन त्यांची मने नेहमी सर्व मानसिक व व्यावसायिक प्रसंगात धैर्यानें राहण्यास पुष्कळ तऱ्हेनें बळकट झालीं आहेत. त्यामुळे त्यांचे हृदयांत जे अज्ञान वसत होते तें जाऊन त्यांना आता आपले बरे वाईट, कोणाशीं कसे वागावें. हा संसाराचा गाडा कसा हाकावा, सत्यता, स्वधर्म, पातिव्रत्य याविषयी त्यांना चांगलें समजू लागलें व यामुळे आपले या भरतखंडाची काही दिवसांनी स्थिती अगदी बदलून जाईल.[७] म. फुलेंनी समाजात अस्तित्त्वात असणाऱ्या बहुपत्नीत्त्वाच्या प्रथेचा विरोध केलेला आहे. त्याचप्रमाणे ताराबाई शिंदे यांनी देखील या पद्धतीचा विरोध पुढीलप्रमाणे केलेला दिसतो.

**महात्मा फुले :** "प्रथम मूळ लग्नाची पहिली स्त्री दादलोजीस आवडेनाशी झाली, म्हणजे त्याने दुसरी ज्वान पट्ठी स्त्री तिचे उरावर करावी, पुढे सदरप्रमाणे दोघीच्या उरावर तिसरी आणि तिघींच्या उरावर आणखी चवथी स्त्री करून अखेरीस तिचा, चोंबडा चाकर बनून रात्रंदिवस तिचे भोवताली गोंडा घोळून मौजा मारितो"[८]

**ताराबाई शिंदे :** "मराठ्यात, देशमुखांत पण, एकाएकाला चार-पाच निदान तीन बायकांना तर खोटच नाही"[९] म.फुलेंनी स्त्रियांचे महत्त्व स्पष्ट करतांना म्हटले आहे की, घराला स्त्रियांमूळे घरपण येते. त्याच्या अस्तित्त्वातूनच घर अस्तित्त्वात येते. असेच विचार ताराबाई शिंदे देखील व्यक्त करतात.

**महात्मा फुले :** "स्त्री घरांत असल्याखेरीज घर शोभत नाहीं, हें आपण जाणतच असाल याविषयी म्हण अशी आहे की, न ग्रहं गृहमित्याहुग्रहिणी गृहमुच्यते"[१०]

**ताराबाई शिंदे :** "स्त्री जाती एक प्रती शक्तीच आहे. तिच्यांवाचून तुम्हांला शोभा, मोठेपण, जय हे कांहींच नाही. दूर कशाला? ज्या घरात ती नाहीं तें घर केवळ स्मशानासारखे ओसाड दिसतें. मग तो एक मोठा सर्व संपत्तीने भरलेला राजवाडा का असेना; त्याला तीच कळा. पण जेथे ती वास करील ती मोडकी तीन वाशाची झोपडी जरी असली तरी एक मोठें शोभिवंत घवघवीत मंदिरच दिसेल"[११] विचारसाम्याप्रमाणे भाषेचेही साधर्म्य या दोघांत दाखविता येते. दगाबाजी, जहामर्द यांसारखे काही शब्द दोघांच्या लेखनात सारखेच आढळतात. त्यामुळे वरवर पाहता या दोघांची भाषाशैली एकरूप वाटते. मालशांना तर ती इतकी एकरूप वाटते की, "एक झाकावी व दुसरी काढावी"[१२] निष्कर्ष, पुरुष कसे पक्षपाती, ठग, धोकेबाज असतात, तसेच बहुपत्नीत्त्वाच्या प्रथेचा विरोध, सतीप्रथेचा विरोध, ब्रिटिश राजवट आणखी काळ टिकावी यासाठी ईश्वराकडे प्रार्थना, स्त्रियांचे घरासाठी महत्त्व, या सर्व बाबतीत म.फुले व ताराबाई शिंदे यांच्या विचारात मोठ्या प्रमाणात साम्य दिसून येते.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) स्त्री-पुरुष तुलना, मालशे स.ग. (संपा), प्रस्तावना पृ.४ २) महात्मा फुले समग्र वाङ्मय, (संपा) फडके, १९९१, पृ.३७५ ३) ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, विलास खोले, प्रस्तावना, पृ. २-३ ४) महात्मा फुले समग्र वाङ्मय, (संपा) फडके, १९९१, पृ. ४४७ ५) ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, विलास खोले, पृ. २७ ६) महात्मा फुले समग्र वाङ्मय, (संपा) फडके, १९९१, पृ. ३३८, ३३९ ७) ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, विलास खोले, पृ. १५ ८) महात्मा फुले समग्र वाङ्मय, (संपा) फडके, १९९१, पृ. ३७५ ९) ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, विलास खोले, पृ. २६ १०) महात्मा फुले समग्र वाङ्मय, (संपा) फडके, १९९१, पृ. ४४७ ११) ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, विलास खोले, पृ. ४८. १२) प्रस्तावना, १९९७५, मालशे, पृ. १७